17 MAY 2022 सकाळ
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘तथागत गोतम बुद्ध’ ही ज्ञानसाहित्यकृती

## प्रा. डॉ. रणधीर शिंदे; तत्कालीन समाजरचना, राजकारण, ग्रामव्यवस्थेचे यथार्थ वर्णन

कोल्हापूर, ता. १६ : ‘तथागत गोतम बुद्ध’ ही कादंबरी आपल्याला बुद्धांच्या काळात घेऊन जाते. त्या काळातील समाजरचना, भाषा, राजकारण, ग्रामव्यवस्था या सर्वांचे यथार्थ वर्णन कादंबरीत आहे. हे महाकथन म्हणजे केवळ कादंबरी नसून ज्ञानसाहित्य कृती आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. कादंबरीचे प्रकाशन आज शाहू स्मारक भवन येथे झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी होते. ‘तथागत गोतम बुद्ध’ ही कादंबरी वसंत गायकवाड यांनी लिहिली असून मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली आहे.

लेखक गायकवाड म्हणाले, ‘‘शालेय जीवनात वाचलेली बुद्धांची रुपक कथा मनात कायम राहिली. यातूनच निवृत्तीनंतर काही वर्षे बुद्धांच्या चरित्राचा अभ्यास करून कादंबरी लिहिली. यासाठी इंग्रजीमधून पाली भाषेचा अभ्यास केला. पाली भाषेमध्ये गौतम असा शब्द नसून गोतम आहे. म्हणून गोतम बुद्ध असा उल्लेख केला आहे.’’

डॉ. शिंदे म्हणाले, ‘‘कादंबरीमध्ये महाकथन केले आहे. पाली भाषेतील शब्दांचे योग्य उपयोजन दिसून येते. बुद्धांच्या काळातील ग्रामरचना, प्रासादांचे वर्णन, समाजरचना, सण, उत्सवांचे यथार्थ वर्णन केले आहे. बुद्धांच्या जन्मापासून मुक्तीपर्यंतचा काळ कादंबरीमध्ये वस्तुस्थितीला धरून उतरवलेला आहे. कादंबरीत १४ कथनकर्ते असून ते बुद्धांच्या जीवनाशी निगडित आहेत. पाली भाषेच्या जवळ जाणारी भाषा असल्याने एक मोठा ऐतिहासिक कालखंड या निमित्ताने उभा राहिला आहे. संशोधन करून लिखाण केल्याने वाचकांना शहाणे करणारी ही कादंबरी आहे. म्हणून ही कादंबरी म्हणजे ज्ञानसाहित्यकृती आहे.’’

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, ‘‘ही कादंबरी बुद्धांच्या काळात घेऊन जाते. वाचताना उत्कंठा वाढते तसा आनंदही मिळतो. ‘युद्ध की बुद्ध’ असा विचार करायला लावणाऱ्या आजच्या काळामध्ये ही कादंबरी नव्या पिढीत बुद्धांच्या विचारांची पेरणी करणारी आहे. गायकवाड यांनी निवृत्तीनंतरही इतके परिश्रम घेऊन ही कादंबरी लिहिली आणि मेहता पब्लिशिंगने ती प्रसिद्ध केली याबद्दल दोघांचेही कौतुक आहे.’’ अनिल मेहता, अखिल मेहता हे उपस्थित होते.




कोल्हापूर : ‘तथागत गोतम बुद्ध’ या कादंबरीचे प्रकाशन सोमवारी झाले. यावेळी (डावीकडून) अखिल मेहता, डॉ. डी. टी. शिर्के, वसंत गायकवाड, डॉ. रणधीर शिंदे.

### पाली भाषेचा अभ्यासक्रम

पाली भाषा ही भारतातील जुन्या भाषांपैकी एक आहे. आज ही भाषा शिकण्याची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे विद्यापीठात पाली भाषेचा अभ्यासक्रम सुरू करणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

सकाळ



सांगली : दिवाण बहादूर अण्णासाहेब लट्ठे सोसायटीच्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटन समारंभात बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर आमदार प्रकाश आवाडे, शांतिनाथ कांते आदी.

# अण्णासाहेब लठ्ठेंचे कार्य दीपस्तंभासारखे

## डॉ. डी. टी. शिर्के : आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन

**सांगली, ता. १६ :** 'दिवाण बहादूर अण्णासाहेब लठ्ठे यांचे कार्य दीपस्तंभासारखे आहे. नव्या पिढीने त्यांचे विचार समजून घेऊन वाटचाल करावी,' असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.

लठ्ठे एज्युकेशन सोसायटी व दिवाण बहादूर अण्णासाहेब लठ्ठे फाऊंडेशन, अमेरिकातर्फे आयोजित 'अण्णासाहेब लठ्ठे यांचे शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय विचार' या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते.

फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. भरत लठ्ठे, आमदार प्रकाश आवाडे, महाराष्ट्र राज्य साहित्य, सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, सागर देशपांडे, लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष शांतिनाथ कांते, सचिव सुहास पाटील, संचालक प्रमोद चौगुले आदी उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, 'दिवाण बहादूर अण्णासाहेब लठ्ठे यांचे जीवन आदर्श होते. त्यांच्या कार्याचा अभ्यास करून नवी पिढी विकास साधू शकते. अलौकिक कार्यापासून तरुण पिढीने प्रेरणा घेतली पाहिजे. लठ्ठे यांचे संपूर्ण साहित्य प्रकाशित करणे गरजेचे आहे.' दिवाणबहादूर अण्णासाहेब लठ्ठे समग्र वाङ्मय खंड एक व दोन या ग्रंथाचे प्रकाशन झाले.

पुण्यनगरी

# ओपन डे कार्यशाळेला प्रतिसाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागात 'ओपन डे कार्यशाळा' आयोजित केली आहे. पहिल्या दिवशी विद्यार्थी-पालकांचा चांगला प्रतिसाद लाभला.

कार्यशाळेत तज्ज्ञ प्राध्यापकांसोबत चर्चासत्रे, नॅनो तंत्रज्ञानातील नावीन्यपूर्ण संशोधनाची प्रात्यक्षिके, सुसज्ज प्रयोगशाळांच्या भेटी यांचा अंतर्भाव आहे. प्रतिजैविक क्रिया, मेमरिस्टर्स, गॅस सेन्सिग, लोटस सुपरहायड्रोफोबिक इफेक्ट, नॅनो फायबर्स, अँटी रस्ट कोटिंग स्प्रे, व्हायरस कवच स्प्रे, डिटॉक्सिफिकेशन, चुंबकीय लोलक, टोटल इंटरनल रिफ्लेक्शन, एसी मोटर, ऑप्टिकल इल्युजन पाहायला मिळत आहे, अशी माहिती अधिविभागाचे संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी दिली आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ विधी विभागामध्ये कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागामार्फत 'ज्युडिशियल एक्झामिनेशन अँड फंडामेंटल ऑफ कोर्ट प्रॅक्टिस' या विषयावर पाच दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश तानाजी नलवडे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. कार्यशाळेत अ‍ॅड. सूर्यकांत मिरजे, डॉ. राजेंद्र अनभुले, निवृत्त जिल्हा न्यायाधीश एस. पी. कुलकर्णी, प्रा. संजय आहेर, अ‍ॅड. विक्रम कुलकर्णी, अ‍ॅड. सचिन माने, सतीश पाटील, एस. टी. चौगुले इत्यादी प्रमुख वक्त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. प्रास्ताविक विधी अधिविभागातील प्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे यांनी, तर सूत्रसंचालन अ‍ॅड आदिती वडेर यांनी केले. आभार सहायक प्राध्यापिका माधवी माळगे, विक्रम इरळे यांनी मानले. यावेळी अ‍ॅड. प्रमोद दाभाडे, ओंकार कोळेकर, एच. डी. निकम-पाटील, हेमलता चाळके, स्नेहल फडणीस, रसिका पाटील यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.